
सोनेरी हंस

मराठी : अश्लेषा



सोनेरी हंस





कोणे एके काळी एक माणूस बायको आणि तीन मुलांसह राहात होता.

ते सर्वजण जंगलाच्या टोकाला असलेल्या एका झोपडीत राहायचे.

सगळ्यात धाकट्या मुलाला लोक ‘येडाबागडा’ म्हणायचे. तो त्याच्या इतर भावांइतका हुशार नसल्यामुळे सगळे त्याला हसायचे देखील.

एके दिवशी सर्वात मोठ्या मुलाला सरपण आणायला जंगलात जावं लागलं. त्याला परत यायला पुष्कळ वेळ लागणार होता म्हणून आईने त्याला मधल्या वेळच्या खाण्यासाठी एक केक आणि वाईनची बाटली दिली.



जंगलात गेल्यावर थोरल्याला एक बुटका म्हातारा भेटला.

“मला फार भूक लागली आहे आणि तहानसुद्धा” बुटका म्हातारा म्हणाला. “मला तुझ्याकडच्या केकचा एक तुकडा आणि वाईनचा एक घोट देशील?”

“मुळीच नाही,” थोरला म्हणाला. “तुला ह्यातलं देत बसलो तर माझ्यासाठी काहीच उरणार नाही. जा इथून”

असं म्हणून तो आपल्या कुऱ्हाडीनं एक मोठं झाड तोडू लागला.



लवकरच त्याच्या हातातून कुऱ्हाड निसटून हाताला इजा झाली आणि मलमपट्टी करायला त्याला घर गाठावं लागलं.



मग मधला मुलगा सरपण आणायला जंगलात गेला. आईनं भावाप्रमाणेच त्यालाही मधल्या वेळच्या खाण्यासाठी एक केक आणि वाईनची बाटली दिली.

पुन्हा एकदा तो बुटका म्हातारा तिकडे अवतरला आणि त्यानं केकचा एक तुकडा आणि वाईनचा एक घोट मागितला.



मधलाही थोरल्यासारखाच स्वार्थी होता.


“तुला ह्यातलं देत बसलो तर माझ्यासाठी किती कमी उरेल,” तो म्हणाला. “जा बघू इथून. मला त्रास देऊ नकोस.”



इतकं दुष्टपणे वागल्याबद्दल त्याच्या भावासारखीच त्यालाही ताबडतोब शिक्षा झाली.

त्यानं लाकूड तोडायला सुरुवात करताच त्याच्या हातातून कुऱ्हाड निसटली आणि पायाला जखम झाली. सरपण न घेताच तो लंगडत घरी गेला.





“बाबा,” येडाबागडा म्हणाला. “मी जाऊ सरपण आणायला?”

“छे, छे,” वडील म्हणाले. “तुला कुऱ्हाड कशी चालवायची आणि जंगलात कसं काम करायचं ठाऊक नाही. आधीच तुझ्या दोन्ही मोठ्या भावांनी लागून घेतलंय. त्यात तुला जाऊ दिलं तर संकटच ओढवून घेतल्यासारखं आहे.”

“जाऊ द्या ना मला बाबा,” येडाबागडा पुन्हा म्हणाला. “मला नक्की जमेल.”

शेवटी वडिलांनी त्याला परवानगी दिली आणि येडाबागडा निघाला. शिळा पाव आणि कडू बियरची एक बाटली सोडून त्याला दुसरं काहीच बरोबर नेता आलं नाही. घरात आता केक किंवा वाईन काहीच शिल्लक नव्हतं.





येडाबागडा जंगलात पोचतो न पोचतो तोच त्याला तो बुटका म्हातारा भेटला.

“मी खूप भूकेलेला आणि तहानलेला आहे,” तो म्हणाला. “मला तुझ्याकडच्या केकचा एक तुकडा आणि वाईनचा एक घोट देशील?”

“माफ करा हं,” येडाबागडा म्हणाला, “माझ्याकडे फक्त शिळा पाव आणि कडू बियर आहे. तुम्हाला चालणार असेल तर आपण ते वाटून खाऊ.”




ते एकत्र जेवायला बसले तेव्हा शिळ्या पावाचं रूपांतर लुसलुशीत केकमध्ये आणि बियरचं रूपांतर वाईनमध्ये झाल्याचं येडाबागड्याला दिसलं.

त्यांचं खाऊन झाल्यावर तो बुटका म्हातारा म्हणाला, “तू तुझ्याकडचं खाणं एवढं मनापासून माझ्याबरोबर वाटून घेतलंयस म्हणून आता मी तुला बक्षीस देणार आहे.”

त्यानं एका झाडाकडे बोट दाखवलं. “ते तिकडचं झाड तोड म्हणजे तुला काहीतरी मिळेल आणि त्यानं तुझं नशीब उजळेल.”





येडाबागडा कुऱ्हाड उचलून ते खास झाड तोडायच्या कामाला लागला.

झाड उखडल्यावर त्याच्या मुळाशी एक सुरेख सोनेरी हंस बसलेला त्याला दिसला. त्याचे पंख शुद्ध सोन्याचे होते.

येडाबागड्याने काळजीपूर्वक त्या हंसाला उचललं. मग रात्र काढायला म्हणून घरी जायच्या ऐवजी तो जवळच्याच एका धर्मशाळेत गेला. झोपायला जायच्या आधी त्यानं त्या हंसाला अगदी जपून गोठ्यात निजवलं.





तिच्या इतर दोन बहिणींनी येऊन तिला मदत करायचा प्रयत्न केला. मात्र जसा त्यांनी आपल्या थोरल्या बहिणीला स्पर्श केला तशा त्या दोघीही तिला घट्ट चिकटून बसल्या. तिघींना ती रात्र एकमेकींना आणि हंसाला चिकटून गोठ्यात काढावी लागली.




धर्मशाळेच्या मालकाला तीन मुली होत्या. त्यांना जेव्हा तो हंस दिसला तेव्हा प्रत्येकीला त्याचं एक सोनेरी पीस मिळवायची इच्छा झाली.

सर्वात आधी थोरली गोठ्यात गेली आणि तिनं एक पीस उपटायचा प्रयत्न केला. मग काय आश्चर्य! तिला तिथून बाजूलाच होता येईना.

दुसऱ्या दिवशी सकाळी येडाबागडा आला आणि हंसाला काखोटीला मारून निघाला. त्या पाखराला आणि एकमेकींना अजूनही चिकटून बसलेल्या त्या तीन मुली त्याला दिसल्याच नाहीत. त्याही त्याच्या मागोमाग निघाल्या.

येडाबागड्याच्या मागोमाग धडपडत जात असतानाच त्यांना एक धर्मगुरू भेटले. येडाबागड्याच्या मागोमाग असं धावत जाणं बरोबर नव्हे असं म्हणत त्यांनी त्यांना थांबवायचा प्रयत्न केला पण ते ही त्यांना चिकटून बसले आणि त्यांनाही त्यांच्या मागोमाग जावं लागलं.





अशी ही वरात गावातून जात असताना येडाबागडा आणि तीन मुलींच्या मागोमाग जाणाऱ्या धर्मगुरूला पाहून चर्चचा अधिकारी आश्चर्यचकीत झाला.

त्यानं धर्मगुरूला मोठ्यांदा ओरडून सांगितलं, “आज दुपारी तुला एका नामकरण समारंभाला जायचंय, विसरू नकोस,” बोलता बोलता त्यानं धर्मगुरूच्या कोटाची बाही पकडली. तोही घट्ट चिकटून बसला आणि त्यालाही त्यांच्या मागोमाग जाणं भाग पडलं.

येडाबागडा आणि सोनेरी हंसाच्या मागोमाग ते सगळे पुढे निघाले. वाटेत त्यांना दोन शेतकरी शेतात नांगरणी करताना दिसले.



"आम्हाला मदत करा," धर्मगुरू आणि चर्च अधिकारी दोघेही एकसुरात ओरडले.

दोघे शेतकरी हातातली फावडी टाकून मदतीला धावले. त्यांनी चिकटलेल्या लोकांना ओढून दूर करायचा प्रयत्न केला पण तेही घट्ट चिकटून बसले.



आता ह्या लहानशा वरातीत सात माणसं झाली होती. सगळेजण त्या सोनेरी हंसाला घट्ट चिकटून बसले होते. येडाबागडा मात्र मजेत त्या हंसाला घेऊन निघाला होता. काहीतरी गडबड असल्याचं त्याच्या लक्षातही आलेलं दिसत नव्हतं.



आपण कुठे चाललोय ते काही येडाबागड्याला समजत नव्हतं. हंस काखोटीला मारून तो नुसताच चालत राहिला.

दऱ्या-खोऱ्यातून, शेतांतून तो आपला हंस घेऊन चालला होता. त्यांनी कितीतरी शहरं आणि गावं ओलांडली. जिथे जातील तिथे लोक आश्चर्यचकित होऊन ह्या वरातीकडे बघत राहायचे.



अखेर, दिवस मावळता मावळता त्यांना एका टेकडीच्या माथ्यावर एक मोठं शहर वसलेलं दिसलं.



येडाबागड्यानं त्या शहराकडे जायचं ठरवलं. मग काय ! त्या लहानशा वरातीलाही त्याच्या मागोमाग जाणं भाग पडलं.






ह्या शहरात एक राजा राज्य करत होता. त्याला एक मुलगी होती. ती बिचारी राजकुमारी आयुष्यात कधीच हसली नव्हती आणि त्यामुळे ते संबंध शहरच दुःखी आणि उदास होऊन गेलं होतं.

राजाला आपल्या मुलीची फार काळजी वाटत असे. जो कोणी तिला हसवून दाखवेल त्याला तिच्याशी लग्न करून युवराज होता येईल असं त्यानं जाहीर करून टाकलं.

येडाबागडा शहराजवळ आला तसं त्याला राजाच्या घोषणेबद्दल समजलं. तो आपली वरात घेऊन थेट महालाकडे गेला.

राजकुमारी खिडकीतून खाली बघत बसली होती. ती फार दुःखी दिसत होती.





येडाबागडा, तो हंस आणि त्याच्या मागोमाग येणारी ती सात जणांची वरात बघता क्षणीच राजकुमारी हसायला लागली. तिला इतकं हसू आलं, इतकं हसू आलं की थांबेचना.

राजकुमारीच्या हसण्यानं चेटूक उतरलं आणि सोनेरी हंसाला चिकटून बसलेले सातही जण मोकळे झाले. ताबडतोब ते आपापल्या घरी जायला निघाले.





तो सोनेरी हंस काखोटीला मारून येडाबागडा मात्र थेट राजाकडे गेला आणि त्यानं बक्षीसाची मागणी केली. राजकुमारीशी लग्न करण्याची मागणी !

आपली मुलगी हसायला लागल्यामुळे राजाला खूप आनंद झाला होता खरा पण येडाबागड्यासारख्या फाटक्या लाकूडतोड्याशी तिचं लग्न करून द्यायची त्याची मुळीच इच्छा नव्हती.

“इतक्या लगेच नाही करता येणार,” राजा म्हणाला. “माझ्या तळघरातली सगळी वाईन पिऊन टाकू शकेल अशा एका माणसाला आधी इकडे घेऊन ये.”

येडाबागड्याला लगेच बुटक्या म्हाताऱ्याची आठवण झाली आणि तो जंगलाकडे निघाला. जिथे त्याला तो सोनेरी हंस सापडला होता त्याच ठिकाणी एक अनोळखी माणूस बसलेला दिसला. तो फार दुःखी दिसत होता.

“काय झालं?” येडाबागड्यानं विचारलं

“मला खूप खूप तहान लागली आहे,” तो अनोळखी माणूस म्हणाला.





“मी तुला मदत करू शकतो,” येडाबागडा म्हणाला. “चल माझ्याबरोबर. तुला अख्खं तळघर भरून वाईन प्यायला देतो.”

ते राजाच्या महालात गेले. तो अनोळखी माणूस बसला आणि पीत सुटला, पीतच सुटला.

त्या दिवशी सूर्यास्ताच्या आत राजाच्या तळघरातलं प्रत्येक पिंप रिकामं झालं होतं. पुन्हा एकदा येडाबागडा राजाकडे गेला आणि त्यानं राजकुमारीशी लग्न लावून देण्याची मागणी केली.






“नाही,” राजा म्हणाला. आपल्या मुलीनं इतक्या साध्या माणसाशी लग्न करावं हे अजूनही त्याला मान्य नव्हतं. “आता एका दिवसात डोंगरएवढा पाव खाऊ शकेल अशा माणसाला घेऊन ये.”

जराही वेळ न दवडता येडाबागडा थेट जंगलातल्या त्या ठिकाणी गेला. ह्यावेळेस देखील त्याला एक माणूस भेटला. डबाभर पाव खाऊनही अजून आपल्याला खूप खूप भूक असल्याचं तो सांगत होता.



हे ऐकून येडाबागडा खूश झाला. तो म्हणाला, “मी तुला मदत करतो. चल माझ्याबरोबर. तुला डोंगराएवढा पाव खाऊ घालतो.”






ते पुन्हा महालात आले. राजाच्या स्वयंपाक्यांनी संबंध शहरातलं पीठ गोळा करून इतका पाव भाजून ठेवला होता की महालासमोर पावाचा मोठा डोंगर तयार झाला होता.

जंगलातून आलेल्या त्या माणसानं खुर्ची किंवा साधी थाळी मिळेपर्यंतही वाट बघितली नाही. उभ्या-उभ्याच तो खाण्यावर तुटून पडला.

पावाची एकेक लादी तो खाऊन संपवू लागला. शहरातले लोक टकामका बघतच राहिले. त्याच्या राक्षसी भुकेचं नवल करत राहिले.

सूर्य मावळू लागला तेव्हा तो पावाचे शेवटचे काही कण संपवत होता. येडाबागड्याचे आभार मानून तो आला तसा नाहीसा झाला.




येडाबागडा पुन्हा एकदा राजाकडे गेला आणि त्याने तिसऱ्यांदा आपल्या होणाऱ्या नवरीची मागणी केली.

पुन्हा एकदा राजाने नकार दिला. ह्यावेळेस तो म्हणाला, “माझ्यासाठी असं जहाज घेऊन ये जे जमिनीवरही चालेल आणि समुद्रावरही. मगच मी तुला माझी मुलगी देईन.”

पुन्हा एकदा येडाबागडा जंगलाकडे निघाला. ह्यावेळेस त्याला तो बुटका म्हाताराच भेटला. त्यानं पूर्वी त्या म्हाताऱ्याबरोबर पाव वाटून खाल्ला होता.





आपल्यावर आलेल्या ह्या तिसऱ्या कामगिरीबद्दल येडाबागड्यानं म्हाताऱ्याला सांगितलं.

बुटका म्हातारा म्हणाला, “मी तुझ्यासाठी वाईन प्यायलो, पाव खाल्ला आणि आता मी तुला हे असं जहाजही आणून देणार आहे. कारण, तू माझ्याशी अत्यंत दयाळूपणे वागला आहेस.”

ह्यावेळेस येडाबागड्याला महालाकडे चालत जावं लागलं नाही. तो जहाजावर चढला आणि निघाला.





ते सुंदर जहाज जेव्हा राजाच्या महालापाशी पोहोचलं तेव्हा तू आता राजकुमारीशी खुशाल लग्न करू शकतोस असं राजानं येडाबागड्याला सांगितलं.

येडाबागडा एक चांगला युवराज झाला आणि दोघे खूप सुखात राहिले.

महालाच्या एका कोपऱ्यात सोनेरी हंसासाठी एक खास घर तयार केलं होतं. तो बुटका म्हातारा मात्र पुन्हा कधीच कोणाला दिसला नाही.

समाप्त